**म.सं.कौ.हिं.का. अर्ज क्र. ६४/२०२४ मधील निशाणी ०४ वरील आदेश**
**(कविता राजेंद्र बेडसे व इतर वि. राजेंद्र भिमराव बेडसे व इतर)**
**(C.N.R.-MHJG03-000716-2024)**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी घरगुती हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा, २००५ चे कलम २३ अन्वये गैरअर्जदार क्र. १ यांचेकडून अंतरिम पोटगी मिळण्यासाठी दाखल केला आहे. गैरअर्जदार क्र. १ यांचे प्रस्तुत अर्जास असणारे म्हणणे निशाणी १६ कडे दाखल आहे.

२) अर्जदारांतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. व्ही. एन. चौधरी व गैरअर्जदार क्र. १ यांचे वतीने विद्वान विधीज्ञ श्री. आर. डी. कच्छवा यांचा युक्तिवाद ऐकला. प्रस्तुतचा अर्ज, मूळ अर्ज व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

३) अर्जदारांतर्फे विद्वान विधिज्ञांनी असा युक्तिवाद केला की, अर्जदारांनी गैरअर्जदारांकडून त्यांचेवर हुंडा मागणीचे व त्याचे पूर्ततेचे कारणावरून तसेच अर्जदार क्र. १ यांचे चारित्र्यावर संशय घेऊन कौटुंबिक हिंसाचार झाला असल्याचे सकृतदर्शनी दाखवून दिले आहे. अर्जदार क्र. १ यांना कोणतेही स्वतंत्र उत्पन्नाचे साधन नाही. गैरअर्जदारांनी अर्जदारांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. गैरअर्जदार क्र. १ यांना ते करीत असलेल्या सुरक्षा रक्षकाचे नोकरीतून पुरेसे उत्पन्न मिळते. त्याचबरोबर गैरअर्जदार क्र. २ यांना शेतीतून घरभाड्याचे रकमेतून उत्पन्न मिळते. गैरअर्जदार क्र. १ यांनी ते नोकरी करीत असल्याची बाब मान्य केली आहे. त्यांच्यावर अन्य कोणीही अवलंबून नाही. गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदार क्र. १ यांचे विरोधात घटस्फोट मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. तसेच त्यांचे विरुद्ध फौजदारी तक्रार देखील दाखल केली आहे. यावरून अर्जदार व गैरअर्जदार यांचे दरम्यान असणारे

नातेसंबंध ताणले असल्याचे दिसून येते. गैरअर्जदार क्र. १ यांनी त्यांना नोकरीतून मिळणाऱ्या वेतनाबाबत स्पष्ट कथने केलेली नाहीत. तथापि, त्यांनी दाखल केलेल्या संपत्ती व उत्तरदायित्वाचे शपथपत्रामधून त्यांना उत्पन्नाचा पुरेसा स्त्रोत असल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे अर्जदार यांनी विनंती केल्याप्रमाणे अंतरिम पोटगी देण्याची गैरअर्जदार क्र. १ यांची ऐपत आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे न्यायाचे व गरजेचे आहे.

४) याउलट, गैरअर्जदार क्र. १ यांचे वतीने विधिज्ञांनी असा प्रतियुक्तिवाद केला की, गैरअर्जदारांनी अर्जदारांवर कोणत्याही प्रकारे कौटुंबिक हिंसाचार केलेला नाही. त्याअनुषंगाने अर्जदारांनी गैरअर्जदारांविरोधात केलेल्या कथनांचे सकृतदर्शनी पुष्टीकरिता कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. अर्जदार व गैरअर्जदार यांचेतील ताणतणावामुळे गैरअर्जदार क्र. १ यास त्याची सुरक्षा रक्षकाची नोकरी सोडावी लागली असून तो सध्या केवळ मजुरीचे काम करतो. गैरअर्जदार क्र. १ चे कुटुंबीयांना शेतीपासून केवळ तुटपुंजे उत्पन्न मिळते व त्यांच्यावर कर्जाचा बोजा आहे. अर्जदारांनी गैरअर्जदार क्र. १ हा नोकरी करीत असल्याचे दर्शविण्यासाठी कोणताही कागदोपत्री पुरावा दिलेला नाही. गैरअर्जदार क्र. १ यांचेवर त्यांचे पालक यांचीही जबाबदारी आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचे दरम्यान वैवाहिक हक्काची पुनःस्थापना होऊन मिळणेसाठी दाखल केलेल्या प्रकरणामध्ये तडजोड झाली होती व त्याप्रमाणे अर्जदार या गैरअर्जदार क्र. १ सोबत राहत होत्या. परंतु पुन्हा अर्जदारांनी कोणत्याही सबळ कारणाशिवाय गैरअर्जदार क्र. १ यांचा त्याग केला आहे. त्यामुळे गैरअर्जदारांना केवळ त्रास देण्यासाठी प्रस्तुतचे प्रकरण अर्जदारांनी

दाखल केले असल्याने त्यांना कोणत्याही प्रकारे अंतरिम पोटगी देता येणार नाही असे प्रतिपादन त्यांनी केले.

५) वर नमूद केल्याप्रमाणे उभय पक्षकार यांनी अर्जात व म्हणण्यात नमूद केलेली कथने, सादर केलेला युक्तिवाद व दाखल केलेली कागदपत्रे यांचा विचार करून सर्वप्रथम ही बाब येथे नमूद करणे जरुरीचे आहे की, गैरअर्जदारांनी अर्जदारांवर कौटुंबिक हिंसाचार केला आहे वा त्या स्वतःहून सबळ कारणाशिवाय गैरअर्जदारांचा त्याग करून वेगळ्या राहतात किंवा कसे या बाबी मूळ अर्जाचे चौकशीचे कामी निर्धारित होणार आहेत. प्रस्तुत अर्जाचे निर्णयाकरिता अर्जदार यांनी विनंती केल्याप्रमाणे अर्जदार क्र. १ स्वतःकरिता व अज्ञान मुलगा अर्जदार क्र. २ याचेकरिता अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र असल्याचे त्यांनी दर्शवून दिले आहे किंवा कसे एवढाच मर्यादित प्रश्न विचारात घेणे जरुरीचे आहे. सदर प्रश्नाचे निर्णयाकरिता अर्जदारांनी या टप्प्यापर्यंत सादर केलेली कथने आणि सादर केलेली कागदपत्रे यांचा विचार करून गैरअर्जदारांनी अर्जदारांवर कौटुंबिक हिंसाचार केला असल्याचे सकृतदर्शनी दाखवून दिले आहे काय हे देखील पाहणे जरुरीचे आहे.

६) त्याअनुषंगाने ही बाब देखील नमूद करणे जरुरीचे आहे की, अर्जदारांनी प्रस्तुत मूळ अर्जाचे कामी अर्जदार क्र. १ यांचा गैरअर्जदारांनी त्यांच्या औषधोपचाराकडे दुर्लक्ष करून, गैरअर्जदार क्र. १ यांचा पहिला विवाह झाला असल्याची बाब लपवून ठेवून, त्यांच्या चारित्र्यावर संशय घेऊन, गैरअर्जदार क्र. १ यांचे कामधंद्यासाठी माहेरून पैसे आणण्याची मागणी करून त्याचे पूर्ततेसाठी शारीरिक व मानसिक छळ करून आणि जिवे मारण्याची धमकी देऊन त्यांचेवर कौटुंबिक हिंसाचार केला असल्याची कथने नमूद केली आहेत. सदर कथनांचे

समर्थनार्थ अर्जदार क्र. १ यांनी स्वतःचे शपथपत्र सादर केले आहे. गैरअर्जदारांनी प्रस्तुत मूळ अर्जास त्यांचे म्हणणे सादर करून अर्जदारांनी कथन केल्याप्रमाणे त्यांनी अर्जदारांचा कोणत्याही प्रकारे कौटुंबिक हिंसाचार करून छळ केला नसल्याचे व अर्जदार क्र. १ यांनी शेतामध्ये काम करण्याचे नाकारून, विनाकारण छोट्या मोठ्या कारणावरून घरामध्ये भांडणे करून दीर्घ कालावधीकरिता वारंवार माहेरी राहणेस जाऊन, गैरअर्जदार क्र. १ यांचेकडे फारकतीची मागणी करून त्याचे मोबदल्यात रक्कम रुपये १०,००,०००/– देण्याबाबत व त्याची पूर्तता न केल्यास आत्महत्या करण्याचे व खोटी कायदेशीर प्रकरण दाखल करण्याचे धमकावून कोणत्याही सबळ कारणाशिवाय गैरअर्जदार क्र. १ यांचा त्याग करून माहेरी राहत असल्याचे प्रतिकथन केले आहे. सदर बाबींचा विचार केला असता उभय पक्षकारांमधील सदरच्या परस्पर विरोधी कथनांबाबत ठोस निर्णय या प्राथमिक टप्प्यावर घेता येणार नाही. त्याबाबत उभय पक्षकारांना पुरावा व प्रतिपुरावा करण्याची संधी देणे गरजेचे आहे. तथापि सद्यःस्थितीत अर्जदार क्र. १ ह्या अर्जदार क्र. २ सह गैरअर्जदारांपासून कोणत्याही सबळ कारणाशिवाय विभक्त राहत असतील असा कयास बांधता येणार नाही. त्याबाबत उभय पक्षकारांनी परस्परांविरोधात गंभीर आरोप व प्रतिआरोप केले आहेत. त्यामुळे अर्जदार यांनी गैरअर्जदारांकडून अर्जदार क्र. १ यांचेवर कौटुंबिक हिंसाचार झाला असल्याचे सकृतदर्शनी दाखवून दिले आहे असे माझे मत आहे.

७) सदरच्या बाबींचा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्यामध्ये नमूद केलेल्या व्यथित व्यक्ती, कौटुंबिक हिंसाचार, कौटुंबिक नातेसंबंध आणि गैरअर्जदार या संज्ञांच्या व्याख्यांचे पार्श्वभूमीवर विचार केला असता गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार क्र. १ यांचा पती व अर्जदार क्र. २ याचे वडील या नात्याने त्यांना अंतरिम पोटगी देण्यास कायदेशीर व नैतिकदृष्ट्या जबाबदार आहे असे माझे मत

आहे. त्याचबरोबर, अर्जदार गैरअर्जदार क्र. १ यांचेपासून सध्या विभक्त राहत असल्याची बाब देखील विनाआव्हानीत आहेत. दरम्यानच्या काळात गैरअर्जदार क्र. १ यांनी त्यांच्या उदरनिर्वाहासाठी काही व्यवस्था केली असल्याचे सकृतदर्शनी विचारात घेता येईल अशा कोणत्याही बाबी गैरअर्जदार क्र. १ यांनी दर्शवून दिलेल्या नाहीत. त्यामुळे या टप्प्यावर उपलब्ध असणाऱ्या सकृतदर्शनी बाबींचा विचार केला असता गैरअर्जदार क्र. १ यांची अर्जदार क्र. १ ही पत्नी व अर्जदार क्र. २ हा मुलगा या नात्याने त्यांच्या किमान उदरनिर्वाहाची सोय करण्यासाठी असणारे कायदेशीर जबाबदारीपासून त्यांना दूर जाता येईल असा त्याचा अर्थ काढता येणार नाही. तशा प्रकारचे न्यायतत्त्व मा. सर्वोच्च न्यायालयाने अनेक न्यायनिवाड्यांद्वारे वारंवार प्रस्थापित केले आहे. त्यामुळे त्या मार्गदर्शक तत्त्वांचा विचार केला असता गैरअर्जदार क्र. १ हे अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ याचे वडील या नात्याने त्यांच्या किमान उदरनिर्वाहाकरिता आवश्यक असणारे रकमेसाठी मूळ अर्जाचा गुणदोषांवर निर्णय होईपावेतो अंतरिम पोटगी देण्यासाठी कायदेशीरदृष्ट्या व नैतिकदृष्ट्या जबाबदार आहे असे माझे मत आहे.

८) आता अर्जदार गैरअर्जदार क्र. १ कडून किती रकमेची अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत व गैरअर्जदार क्र. १ याची त्यांना अंतरिम पोटगी देण्याची ऐपत आहे काय या बाबीचा विचार केला असता अर्जदारांनी गैरअर्जदार क्र. १ यांना अर्जदारांना अंतरिम पोटगी देण्यासाठी उत्पन्नाचा स्त्रोत असल्याचे सकृतदर्शनी दाखवून दिले आहे काय हे पाहणे जरुरीचे आहे. त्याबाबत अर्जदारांनी गैरअर्जदार क्र. १ यांना सुरक्षा रक्षकाच्या नोकरीतून उत्पन्नाचा स्त्रोत असल्याचे कथन केले आहे.

९) गैरअर्जदार क्र. १ यांनी सुरक्षा रक्षकाची नोकरी सोडली असून ते सध्या केवळ मजुरी करीत असल्याचे प्रतिकथन केले आहे. अर्जदारांनी गैरअर्जदार क्र. १ नेमके कोणत्या ठिकाणी नोकरी करीत आहेत व त्यांना किती उत्पन्न मिळते हे दर्शविण्यासाठी कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ हे निश्चितपणे सुरक्षा रक्षकाची नोकरी सध्यादेखील करीत आहेत असे सकृतदर्शनी म्हणता येणार नाही. तथापि, गैरअर्जदार क्र. १ यांनी स्वतःहूनच ते मजुरी करीत असल्याचे मान्य केले असल्याने मजुरीतून ते उत्पन्न मिळविण्यास सक्षम असल्याचे दिसून येते. अर्जदारांनी गैरअर्जदार क्र. २ व ३ यांचे उत्पन्नाचे स्त्रोताबाबत केलेल्या कथनांबाबतही कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केला नसल्याने व तसे काही उत्पन्न असल्यास त्यातून अर्जदार क्र. १ यांना स्वतःकरिता व अर्जदार क्र. २ यांचेकरीता पोटगी मागता येत नसल्याने त्या तथाकथित उत्पन्न स्त्रोताचा अधिक ऊहापोह याठिकाणी केलेला नाही.

१०) सदर बाबींचा विचार केला असता, गैरअर्जदार क्र. १ यांना मजुरीचे माध्यमातून निश्चितपणे उत्पन्नाचे साधन आहे हे विचारात घेणे गरजेचे आहे. गैरअर्जदार क्र. १ यांनी त्यांना नियमित मजुरी मिळत नसल्याचे जरी प्रतिकथन केले असले तरी गैरअर्जदार क्र. १ यांच्या वयाचा व शारीरिक क्षमतेचा विचार केला असता त्यांना स्वतःकरिता उत्पन्न मिळविण्याबरोबरच अर्जदार क्र. १ या त्यांची पत्नी व अर्जदार क्र. २ हा त्यांचा मुलगा या नात्याने त्यांचे पालनपोषणाकरिता व उदरनिर्वाहाकरिता अधिक श्रम करून व्यवस्था करण्याची त्यांचेवर कायदेशीर जबाबदारी आहे व ती ते कोणत्याही परिस्थितीत टाळू शकत नाही. गैरअर्जदार क्र. १ यांनी अर्जदार क्र. १ या शिवणकाम व ब्युटीपार्लरचे काम करून दरमहा दहा ते पंधरा हजार रुपये मिळवित असल्याचे जरी कथन केले असले तरी त्याची सकृतदर्शनी पुष्टी

करण्यासाठी कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे सदरची बाब सकृतदर्शनी विचारात घेण्यासारखी नाही.

११) सदर बाबींचा विचार केला असता गैरअर्जदार क्र. १ यांची कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्याचे कलम २३ चे तरतुदीअन्वये अर्जदार यांना अंतरिम पोटगी देण्याची कायदेशीर जबाबदारी आहे असे माझे मत आहे. अर्जदार यांना अंतरिम पोटगी म्हणून किती रक्कम गैरअर्जदार क्र. १ ने देण्याचे आदेशीत करावे या बाबीचा विचार केला असता अर्जदारांनी त्यांना प्रत्येकी दरमहा रक्कम रू. १०,०००/– एवढी रक्कम अंतरिम पोटगी म्हणून मिळावी अशी विनंती केली आहे. तशी विनंती केल्याप्रमाणे पोटगी मंजूर करण्याकरिता अर्जदारांनी गैरअर्जदारांविरोधात दाखल केलेल्या इतर प्रकरणांमध्ये अंतरिम अथवा अंतिम पोटगीचे आदेश झाले असल्यास त्यामध्ये मंजूर केलेल्या अंतरिम अथवा अंतिम पोटगी रकमेचा विचार प्रस्तुत प्रकरणाची अंतरिम पोटगी ठरवित असताना करणे हे ***मा. सर्वोच्च न्यायालयाने रजनेश वि. नेहा, फौजदारी अपील क्र. ७३०/२०२०*** चे प्रकरणामध्ये ***दिनांक ०४/११/२०२०*** रोजी दिलेल्या न्यायनिवाड्यातील निर्देशांप्रमाणे जरुरीचे आहे.

१२) त्याबाबत अर्जदारांनी या न्यायालयात प्रस्तुत प्रकरणाशिवाय फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १३०/२०२४ चे अन्य एक प्रकरण पोटगी मिळण्यासाठी दाखल केले असले तरी सदर प्रकरणाचे कामी अद्याप कोणतेही अंतरिम पोटगीचे आदेश पारित झाले नसल्याबाबत अर्जदार क्र. १ यांनी त्यांच्या मालमत्ता व दायित्वाबाबतच्या प्रतिज्ञापत्रामध्ये नमूद केले आहे व सदर बाबीची पुष्टी करण्याकरिता निशाणी २१ कडे पुरसिस देखील दाखल केली आहे.

१३) सदर बाबींचा विचार केला अर्जदारांचे उदरनिर्वाहाचा, औषधपाण्याचा व कपड्यालत्त्यांचे खर्चाचा विचार केला असता, तसेच प्रकरणातील तथ्यांचा, केलेल्या आरोपांचे स्वरूपाचा, अर्जात नमूद कथनांमधून दिसून येणाऱ्या अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचे राहणीमानाचा व सध्याचे स्थितीचा विचार केला असता अर्जदार क्र. १ यांना गैरअर्जदार क्र. १ यांचेकडून दरमहा रक्कम रू. ४,०००/– आणि अर्जदार क्र. २ यांना गैरअर्जदार क्र. १ यांचेकडून दरमहा रक्कम रू. २,०००/– इतकी अंतरिम पोटगीपोटी देण्याचे आदेशीत केल्यास या प्रकरणात न्यायोचित समतोल साधला जाईल असे माझे मत आहे. प्रस्तुत प्रकरणात प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्यापासून गैरअर्जदार क्र. १ यांनी कोणतीही पोटगीची व्यवस्था केली नसल्याचे दिसून आले असल्यामुळे सदरची अंतरिम पोटगीची रक्कम अर्जदारांना प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासून मंजूर करणे देखील न्यायाचे व गरजेचे आहे असे माझे मत आहे. या सर्व बाबींचा विचार केला असता अर्जदारांचा प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर होणेस पात्र आहे असे माझे मत आहे. सबब मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

१. अर्जदारांचा प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर करणेत येतो.

२. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्याचे कलम २३ अन्वये गैरअर्जदार क्र. १ यांनी प्रस्तुत अंतरिम पोटगीचा अर्ज दाखल केल्याच्या दिनांकापासून म्हणजे दि. ०६/०८/२०२४ पासून अर्जदार क्र. १ यांना दरमहा रक्कम रू. ४,०००/– (अक्षरी रुपये चार हजार मात्र) आणि अर्जदार क्र. २ यांना दरमहा रक्कम रू. २,०००/–(अक्षरी

रुपये दोन हजार मात्र) इतकी रक्कम अंतरिम पोटगी म्हणून प्रस्तुत अर्जाचे अंतिम निकालापावेतो अदा करावेत असे आदेशीत करण्यात येते.

३. प्रस्तुत अर्जाचा अंतिम निकाल होण्यापूर्वीच अर्जदार क्र. २ हे सज्ञान झाल्यास त्या दिनांकापासून त्यांना मंजूर करण्यात आलेली अंतरिम पोटगी देय राहणार नाही.

४. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्याचे कलम २२ अन्वये प्रस्तुत आदेशाच्या प्रती अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांना विनामूल्य देण्यात याव्यात.

CHOUGALE EKANATH KOYAPPA

Digitally signed by CHOUGALE EKANATH KOYAPPA
Date: 2026.04.02 12:57:13 +0530

स्थळ:– अमळनेर
दि. २५/०३/२०२६

(एकनाथ को. चौगले)
(JO Code -MHJG2400)
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, अमळनेर